आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

२४ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याच्या वाटचालीत महिलांचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ देशातल्या ११ लाख लखपती दीदींशी जळगावातल्या कार्यक्रमातून साधला संवाद

- विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी समर्पणाच्या भावनेची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- कोलकाता इथल्या आरजी कर रुग्णालयमधल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी सीबीआयचा तपास सुरु

**आणि**

- महाराष्ट्राच्या अनेक भागात संततधार पाऊस / पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट

**<><><><><>**

देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याच्या वाटचालीत महिलांचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जळगाव मध्ये आज झालेल्या लखपती दिदी संमेलनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींना, प्रतिकात्मक स्वरुपात प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला गेला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत १ कोटी लखपती दीदी

झाल्या आहेत, तर गेल्या दोन महिन्यात त्यात आणखी ११ लाख लखपती दीदींची भर पडल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ सिंदे, आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

नेपाळ दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. केंद्र सरकारनं कोकणाचाही विचार करावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महिला मुख्य प्रवाहात आल्या, तरच विकसित भारताचं स्वप्न साकार करता येईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. नार-पार-गिरणा योजनेच्या निविदा प्रक्रियेला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देणार असल्याचंही फडणवीस यांनी यावेळी जाहीर केलं. तर राज्यात ५० लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प करू या असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

<><><><><>

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राजकीय पार्श्वभूमी नसतानाही अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच भावनेची गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११३वा भाग होता.

आज  मोठ्य़ा संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना केवळ योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधीची गरज आहे असं त्यांनी सांगितलं. युवकांनी या अभियानात स्वतःला जोडून घ्यावं असं आवाहन करतानाच, युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलवून टाकणारं ठरेल असं ते म्हणाले.

यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवल्या गेलेल्या हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या निमित्तानं देशभरात अभिनव पद्धतीनं काढलेल्या तिरंगा यात्रांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. जेव्हा लोक एकत्र येऊन आपल्या भावना प्रकट करतात तेव्हा अशा प्रकारची अभियानं प्रचंड यशस्वी होतात असं ते म्हणाले. स्वातंत्र्य दिन आता एक सामाजिक पर्व झालं असून, या अभियानामुळे ई कॉमर्स मंचावर तिरंग्याच्या रंगाच्या सामानाची विक्री वाढत असल्याचं निरीक्षण त्यांनी आज मन की बात मध्ये नोंदवलं. या अभियानानं संपूर्ण देशाला एका सूत्रानं बांधलं असल्याचं ते म्हणाले.

आजच्या मन की बात मधून प्रधानमंत्र्यांनी प्राणी तसंच पर्यावरण संवर्धन आणि रक्षणासाठी देशाभरात सुरु असलेल्या काही अभिनव प्रयत्नांची, आणि अशा प्रयत्नांत योगदान देत असलेल्या तंत्रज्ञानाधारीत स्टार्ट अप्सची उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली. या क्षेत्रात अधिकाधिक स्टार्ट अप्स येऊ लागले तर त्यामुळे पशुपक्ष्यांच्या संरक्षणासोबतच, परंपराही टिकून राहतील, असं ते म्हणाले. देशातली अनेक स्टार्टअप्स पर्यावरणाला चालना देण्याचं काम करत असल्याबद्दल त्यांनी आनंदही व्यक्त केला. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर पर्यावरणाचं रक्षण होईल आणि देशही पुढे जाईल, असं ते म्हणाले.

कुटुंब, समाज आणि देशाचं भवितव्य आजच्या लहान मुलांवर अवलंबून आहे, त्यामुळेच या मुलांचं पोषण ही देशाची प्राथमिकता असल्याचं ते म्हणाले. यादृष्टीनंच मुलांना योग्य पोषण आहार मिळावा म्हणून सरकारच्या वतीनं राबवल्या जात असलेल्या धोरणात्मक उपाययोजनांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली आणि प्रत्येकानं आपल्या क्षेत्रातल्या पोषणविषयक जागरूकता अभियानांशी जोडून घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. प्रत्येकाच्या लहानशा प्रयत्नानं कुपोषणा विरोधातल्या लढ्याला मोठं बळ मिळेल असं ते म्हणाले.

नुकताच २३ ऑगस्टला देशानं पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा केल्याचं सांगताना, त्यांनी मागच्या वर्षी याच दिवशी भारताचं चांद्रयान तीन चंद्राच्या दक्षिण भागात शिव - शक्ती पॉइंट इथं यशस्वीपणं उतरल्याच्या कामगिरीला उजाळा दिला. यानिमीत्तानं त्यांनी अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या गॅलेक्स आय या स्टार्ट अपच्या चमूशीही संवाद साधला. २१ व्या शतकातल्या देशातल्या घडामोडींमुळे विकसित भारताचा पाया मजबूत होत असल्याचं ते यावेळी म्हणाले. संस्कृत भाषा संवर्धनासाठी देशात आणि जगात होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख त्यांनी केला, आणि संस्कृतला प्रोत्साहन देण्यासाठीचे प्रयत्न सुरु ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं. लवकरच पॅरिसमध्ये होणार असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत देशाचं प्रतिनिधीत्व करत असलेल्या आपल्या दिव्यांग खेळाडूंना चिअर फॉर भारत हा हॅश टॅग वापरून प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही त्यांनी नागरिकांना केलं.

एक पेड मां के नाम या अभियानाची आठवण करून देत, प्रत्येकानं जास्तीत जास्त झाडं लावण्याचं - त्यासाठी इतरांना प्रोत्साहन देण्याचं,

तसंच नागरिकांनी पावसाळ्यात स्वतःची काळजी घेण्यासोबतच जलसंवर्धनांच्या मोहिमांमध्येही सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी आजच्या मन की बात मधून केलं. येत्या काही दिवसात साजऱ्या होणाऱ्या जन्माष्टमी, गणेशोत्सव, ओणम, मिलाद उन नबी या सणांसह तेलुगू भाषा दिनाच्या शुभेच्छा त्यांनी नागरिकांना दिल्या.

<><><><><>

लखपती दीदी मेळाव्यात भाग घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज छत्रपती संभाजीनगर मार्गे जळगावात आगमन झालं. छत्रपती संभाजीनगर विमानतळावर गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, पालकमंत्री अब्दुल सत्तार, यांच्यासह स्थानिक खासदार- आमदार, तसंच जिल्हाधिकारी पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. जळगाव विमानतळावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी मदत, पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. प्रधानमंत्र्यांनी विमानतळावर उपस्थित लखपती दिदींशी संवाद साधला. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन देखील या कार्यक्रमासाठी जळगावात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार देखील कार्यक्रमासाठी जळगावात आले असून त्यांचं स्वागत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं. लखपती दीदी संमेलनानंतर प्रधानमंत्री आज राजस्थानसाठी रवाना होतील.

<><><><><>

कोलकाता इथल्या आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामधल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी सीबीआयनं आज सकाळी १५ ठिकाणी भेट देऊन तपासणी केली. सीबीआयचं पथक आरजी करचे माजी प्राचार्य डाॅ संदीप घोष यांची त्यांच्या निवासस्थानी चौकशी करत आहेत. तसंच सीबीआय महाविद्यालयातचे नवे प्राचार्य आणि उपप्राचार्य यांची चौकशी करत आहे. याशिवाय आरजी करचे प्राध्यापक डॉ. देबाशीष सोम, माजी वैद्यकीय अधीक्षक आणि उपप्राचार्य डॉ. संजय वशिष्ठ आणि वैद्यकीय सामुग्री पुरवठादार बिप्लव सिंग यांची देखील सीबीआय त्यांच्या निवासस्थानी चौकशी करत आहेत.

**<><><><><>**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ३१ जुलै नंतर आलेल्या अर्जांची पडताळणी प्रक्रिया सुरू असून पात्र महिलांना लवकरच लाभ मिळणार असल्याचं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. अर्जांची प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरू असून प्रशासकीय मान्यतेनंतर पात्र महिलांची माहिती विभागाकडं येते. त्यानंतर ही यादी बँकेकडे पाठवली जाते असं त्या म्हणाल्या. आतापर्यंत राज्यभरातून या योजनेसाठी २ कोटी ६ लाख १४ हजार ९९० अर्ज प्राप्त झाले. यापैकी १ कोटी ४७ लाख ४२ हजार ४७६ अर्ज पात्र ठरले. तर ४२ हजार ८२३ अर्जाची पडताळणी सुरू आहे. ' राज्यात योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत असून बँक खात्याला आधारकार्ड क्रमांक लिंक करून घेत जास्तीत जास्त महिलांनी योजनेचा लाभ घेण्याचं आवाहन तटकरे यांनी केलं आहे.

**<><><><><>**

आषाढीवारी निमित्त पंढरपूरात येणाऱ्या पायी दिंड्यांना प्रति दिंडी २० हजाराचे अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली होती. त्यानुसार दिंडी चालकांच्या खात्यात प्रत्येकी २० हजार रुपयांचे अनुदान जमा करण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं मान्यता दिली आहे. प्रत्येक दिंडी चालकांनी दिंडीची संपूर्ण माहिती, बँक खाते क्रमांक कळविण्याचं आवाहन शासनानं केलं होतं. त्यानुसार किमान ८४७ दिंड्या येत असल्याची प्राथमिक माहिती शासनाला प्राप्त झाली होती. आता पर्यंत श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी संस्थान आळंदी यांच्याकडून जवळपास १७० दिंड्याची परिपूर्ण माहिती शासनाला देण्यात आली असून उर्वरित दिंड्यानी तातडीनं शासनाला माहिती सादर करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**<><><><><>**

मंकी पॉक्स विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाकडून पुणे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाय राबवण्यात येत आहेत. सिंगापूर आणि दुबई इथून आलेल्या ५३१ प्रवाशांची तपासणी पुणे विमानतळावर गेल्या सहा दिवसांत करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी मुसळधार पाऊस सुरु असून बहुतांश धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. **नांदेड**मधल्या विष्णुपुरी प्रकल्पाचे दोन दरवाजे काल सायंकाळी उघडण्यात आले. त्यामुळे गोदावरी

नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. **नाशिक** जिल्ह्यातल्या बहुतांश धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. गंगापूर धरणातून काल संध्याकाळी ७ हजार ४३१ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आलाजिल्ह्यातल्या नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून काल रात्री ३० हजार १६९ क्युसेक तर पालखेड धरणातून कादवा नदीमध्ये ८३० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. नाशिक शहरात मुसळधार पाऊस सुरू असल्यानं गोदावरी नदीला पूर आला आहे. गोदावरी नदीच्या इशारा पातळी पर्यंत पाणी आल्याने नाशिक महापालिकेनं नदीकाठच्या नागरिकांना तातडीने स्थलांतरित होण्याचं आवाहन केलं आहे. नाशिक मध्ये मुसळधार पावसामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला. **पालघर** जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू आहे. **धुळे** जिल्ह्यात पांझरा नदीवरच्या अक्कलपाडा प्रकल्पाच्या धरणाचे सर्व दरवाजे आज दुपारी सव्वा बारा वाजता उघडून १२ हजार १०० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे पांझरा नदीला मोठा पूर आला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मुंबईसह अनेक भागात आज संततधार पाऊस सुरू आहे. राज्यातल्या **पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा** जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट हवामान विभागानं जारी केला आहे. मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**